६७१९.वि

2016010711020163०7

निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना ओळखपत्र देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १०९९/१२२०/१८ (र.व का.)
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै,२०००.

## परिपत्रक

शासन सेवेत असताना शासकीय कर्मचा-यांना ओळखपत्रे देण्यात येतात. परंतु सदर कर्मचारी निवृत्त झाल्यावर आपापली ओळखपत्रे परत करावी लागतात.

२. शासकीय अधिकारी / कर्मचा-यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या लाभासाठी उदा.पेन्शन,ग्रॅच्युइटी इत्यादिसाठी अनेक वेळा आपापल्या कार्यालयात तसेच संबंधित कार्यालयात ये/जा करावी लागते. परंतु त्यांच्याकडील ओळखपत्रे शासनाकडे जमा झालेली असल्यामुळे त्यांना आपल्या कार्यालयात प्रवेश मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे त्यांना काही कालावधीकरिता ओळखपत्रे देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

३. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की,शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या पदावरुन निवृत्त झाले आहेत ते पद नमूद करुन त्यांना सेवानिवृत्तीनंतर एका वर्षाच्या कालावधीसाठी फोटोसह ओळखपत्र देण्यात यावे. जेणेकरुन सेवानिवृत्तीनंतरची कामे करुन घेणे त्यांना सुलभ होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
म.शं.बिडवई
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
५. शासनाचे मुख्य सचिव,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
७. सचिव,विधानसभा / विधानपरिषद,विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१२. निवड नस्ती.

========

एच–830(4000–9–00)